वर्ष पंधरावे : अंक ०४ : एप्रिल २०२६



जागतिक श्रवणदिनानिमित्त

जनजागृती रॅली, जनता वसाहत

कोथरुड केंद्र

# कॉक्लिआ वार्ता

मुकं करोति वाचालं...

COCHLEA - PUNE

कॉक्लिआ पुणे

श्रवण आणि वाचा विकासासाठी

FOR HEARING & SPEECH

◆ 1998 ◆

# COCHLEA WARTA



अंगणवाडीला भेट
खेड केंद्र



अंगणवाडीला भेट
मंचर केंद्र



जनजागृती रॅली
दौंड केंद्र

Volume Fifteen : Issue 04 : APRIL 2026 Total Pages : 20 Rs. 10/-

# जागतिक श्रवणदिनानिमित्त जनजागृती अभियान



मोरया आणि वायसीएम सेंटर





तीन हत्ती चौक



जयभवानी नगर

# वार्षिक स्नेहसंमेलन



पर्वरी आणि पोंडा गोवा सेंटर










**उपस्थित पाहुणे**
डॉ. संतोष उसगावकर
सौ. गीताली तलौलीकर

COCHLEA WARTA कॉक्लिआ वार्ता

वर्ष : १५ वे | अंक : ०४

## अंतरंग

**संपादक**
डॉ. अविनाश वाचासुंदर

**कार्यकारी संपादक**
सौ. मानसी दाते

**कार्यकारी मंडळ**
मृदुल हेमंत बापट
तृप्ती कोहिनकर
नेहा नाटेकर
Mr. Ebenezer Harding

**मुद्रण** :
व्यंकटेश प्रिंटर्स, पुणे.

**मुखपृष्ठ व सजावट** :
श्री. संजीव शिंदे

**Editorial** ... ०२
- Mrs. Manasee Date

**जागतिक श्रवणदिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम व महिला दिनानिमित्त मानसिक आरोग्य सत्र** ... ०३
– अनुपमा ढमाळ

**RCI-Accredited CRE Workshop - Report** ... ०५
– स्मृति कुलकर्णी

**अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्यासाठी जनजागृती – सत्र** ... ०७
– अनुपमा ढमाळ

**जागतिक महिला दिन–पालक सप्ताह** ... ०८
– सोनाली करमरकर

**जागतिक श्रवणदिन जनजागृती रॅली** ... ०९
– नेहा नाटेकर

**गोव्याचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे पर्वरी केंद्र** – गोकुळ नवंगुने ... ११

**होय... आमची वीरा बोलू लागली** ... १३
– जगदीश नलवडे

| | | |
|---|---|---|
| **Printed & Published by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Owned by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Printed by** | : | Sanjeev V. Shinde<br>Paud Road, Kothrud, Pune. |
| **Published at** | : | Cochlea Pune for Hearing and Speech<br>161-A, Modibaug, Shivsagar Society,<br>Near Mhasoba Gate, Shivajinagar, Pune 411 016. |
| **Editor** | : | Dr. Avinash Madhav Wachasundar |

# EDITORIAL

**- Mrs. Manasee Date**

World Hearing Day was celebrated in a very innovative way in Swaranaad, by organizing awareness program for Anganwadi teachers, sevika and supervisors along with Mental healthcare and stress management on 11th March 2026.

The teachers, sevika and supervisors of Anganwadi were given tips, how to detect a hearing impaired child and what to do after detection. They were taken in batches to class rooms to show how the children are taught.They were introduced to hearing impaired children in Swaranaad. They were so much moved to see their development that they confirmed that they will definitely try to find such children and send them to Cochlea. Some showed interest in doing the DECSE (HI) course.

After that Ashwini Nerlikar madam, psychologist, involved all the ladies in some games, so they became relaxed and started talking to her. They were shown videos to understand the reasons for stress and solutions for the same also she explained how to identify emotions & Manage them. All the 46 ladies who participated in this program were very satisfied with the knowledge and information they got.

CRE was conducted from 23rd to 25th March at Divyang Bhavan, Pimpri-Chinchwad. The central theme of the workshop, 'Cross Disability EarlyIntervention for facilitating Inclusive Education of Children with Disabilities,' focused on equipping professionals with comprehensive and inclusive approach to early intervention. 50 participants from across Maharashtra took part in the workshop, reflecting astrong commitment towards advancing inclusive education practices.

Awareness drive was arranged in 3 places in Pune -

a) 26th Feb at Varjenaka, Anganwadi
b) 14th March at Chavadichi Anganwadi, Ramnagar.
c) 20th March at Teen Hatti Chowk at Dhanakawadi.

Outcome of this drive was two children were referred to Cochlea for intervention.

As usual Holi was celebrated in all the centers.

On 5th March an awareness drive was organized at the foothills of Parvati. 35 hearing impaired children with parents, 30 teachers and 15 staff members took part in this drive. They started from the school and at 10 am reached Janata Vasti. Brochures were distributed, slogans were given and some people showed interest and asked some questions.

Raksha Deshpande, our Director education was given the award by *“Mahila Din Vishesh Nari Shakti Sanmaan and Sanwad”*. All were impressed by the sanwad she had with the audience.

Then there is a write up from a grandfather about his Hearing impaired granddaughter Veera. It is so nice to receive such feedback, which keep on coming from parents and relatives of hearing impaired children.

These are like feathers in the cap of our teachers. No doubt they deserve to be appreciated and so Cochlea gave the full team of Swaranaad a good time on a day full of fun to celebrate Women's Day.

◆◆◆

## जागतिक श्रवणदिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम व महिला दिनानिमित्त मानसिक आरोग्य सत्र

**अनुपमा ढमाळ**
सोशल वर्कर, स्वरनाद कोथरुड केंद्र

**विषय : मनाशी संवाद**
**दिनांक : ११ मार्च २०२६ उपस्थिती : ४६**

**कार्यक्रमाची रूपरेषा –**
**सकाळी १०.०० ते ११.०० : नोंदणी व स्वागत**
**सकाळी ११.०० ते दुपारी १२.३० : तज्ज्ञांकडून 'मनाशी संवाद' या विषयावर सत्र व उपक्रम**
**दुपारी १२.३० ते दुपारी ०१.३० : जेवण व केंद्र भेट**

### कार्यक्रमाचे उद्दिष्ट :

– कर्णबधिर मुलांचे लवकर निदान व लवकर उपचार याविषयी अंगणवाडी कर्मचारी वर्गामध्ये जनजागृती करणे.

– ० ते ६ वयोगटातील मुलांमध्ये श्रवणदोषाची लक्षणे ओळखण्याबाबत मार्गदर्शन करणे.

– श्रवणदोष असलेल्या मुलांना योग्य संस्थेकडे संदर्भित करण्याची प्रक्रिया समजावून सांगणे.

– सहभागी कर्मचाऱ्यांना संस्थेच्या कार्याचा व सेवांचा सविस्तर परिचय करून देणे.

– महिला दिनाच्या निमित्ताने कर्मचारी महिलांसाठी मानसिक आरोग्य, भावना व ताण–तणाव व्यवस्थापनाविषयी मार्गदर्शन करणे.

– कर्मचारी वर्गामध्ये कर्णबधिर मुलांच्या पुनर्वसनाबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणे.

– ICDS प्रकल्पातील कर्मचारी व संस्थेमध्ये समन्वय व सहकार्य वाढवणे.

### कार्यक्रमाचा तपशील :

महिला दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाची सुरुवात स्वागत समारंभाने करण्यात आली. कार्यक्रमासाठी नोडल ऑफिसर व बालविकास प्रकल्प अधिकारी मा. मनीषा बिरारिस मॅडम तसेच तृप्ती ढेरे मॅडम या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. याशिवाय अंगणवाडी सेविका व मुख्य सेविका यांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

अंगणवाडी कर्मचारी व संस्थेचे कार्यक्षेत्र हे दोन्ही ० ते ६ वयोगटातील मुलांशी संबंधित असल्यामुळे या वयोगटातील मुलांमध्ये श्रवणदोषाची लक्षणे आढळल्यास त्यांना योग्य ठिकाणी संदर्भित करण्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा कार्यक्रमाचा महत्त्वाचा भाग होता.

कार्यक्रमाच्या पुढील सत्रामध्ये मानसोपचारतज्ञ अश्विनी नेरळीकर मॅडम यांनी मनाशी संवाद या विषयावर मार्गदर्शन केले. सत्राच्या सुरुवातीला त्यांनी काही संवादात्मक खेळ घेतले व सहभागी महिलांशी मैत्रीपूर्ण संवाद साधत त्यांना मोकळेपणाने व्यक्त होण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांनी तणाव निर्माण होण्याची कारणे तसेच त्यावर उपाय त्याचप्रमाणे भावना आणि भावनांचे व्यवस्थापन याबाबत दृकश्राव्य माध्यमांच्या साहाय्याने सविस्तर माहिती दिली. हे सत्र अत्यंत सहभागात्मक स्वरूपाचे झाले. सहभागी महिलांनी मनापासून सहभाग घेतला तसेच विविध प्रश्न विचारून शंका निरसन करून घेतले.

यानंतर संस्थेच्या शिक्षण संचालिका सौ. रक्षा देशपांडे मॅडम यांनी संस्थेचा सविस्तर परिचय करून दिला. त्यांनी कर्णबधिर मुलांची लक्षणे कशी ओळखावी, त्यांचे निदान व उपचार, पूर्वप्राथमिक प्रशिक्षण, पालक प्रशिक्षण तसेच संस्थेमध्ये दिल्या जाणाऱ्या विविध सेवांबाबत माहिती दिली. यावेळी संस्थेची डॉक्युमेंटरी तसेच या विषयावरील एक लघुपटही दाखविण्यात आला. सहभागी कर्मचारी महिलांनी अत्यंत लक्षपूर्वक व शांतपणे ही माहिती ऐकली.

यानंतर मा. बिरारिस मॅडम यांनी आपले मनेगत व्यक्त करत कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांनी या कार्यक्रमातून नवीन माहिती मिळाल्याचे तसेच तणाव व्यवस्थापनाविषयी उपयुक्त मार्गदर्शन झाल्याचे नमूद केले.

शेवटी आभार प्रदर्शन करण्यात आले. त्यानंतर सहभागी महिलांना संस्थेची प्रत्यक्ष भेट देता यावी यासाठी १० जणींच्या गटांमध्ये विभागून संस्थेची पाहणी करण्यात आली. कार्यक्रमाची सांगता भोजनाने करण्यात आली.

**परिणाम : कार्यक्रमाचे उद्दिष्ट यशस्वीरित्या पूर्ण झाले.**

– कर्णबधिर मुलांबाबतची माहिती अनेक कर्मचाऱ्यांसाठी नवीन होती व त्यांना ती समजली.

– संस्थेचे कार्य, शाळा व विविध सेवा याविषयी सहभागी महिलांना सविस्तर माहिती मिळाली.

– शाळेला भेट दिल्यामुळे सहभागी महिलांना कर्णबधिर मुलांशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची संधी मिळाली आणि अशी मुले संवाद साधू शकतात याचा अनुभव त्यांनी घेतला.

– भविष्यात त्यांच्या संपर्कात अशी मुले आढळल्यास त्यांना संस्थेकडे संदर्भित करण्याची सकारात्मक भूमिका त्यांनी दर्शविली.

– विशेषतः पूर्वप्राथमिक शिक्षण, पालक प्रशिक्षण, स्वीच थेरपी तसेच D.E.C.S.E (HI) या डिप्लोमा कोर्स बाबतही सहभागी महिलांनी विशेष रस दाखविला.

– कार्यक्रमादरम्यान सहभागी महिलांमध्ये सहकार्याची व सकारात्मक सहभागाची भावना दिसून आली.

◆◆◆

## Report on RCI-Accredited CRE Workshop March 23-25, 2026

**Smruti Kulkarni**
DECSE (HI) Course Co-ordinator, Cochlea Pune for Hearing & Speech

An RCI-accredited Continuing Rehabilitation Education (CRE) workshop was successfully conducted from March Date 23 to March 25, 2026 at Divyang Bhavan, Pimpri-Chinchwad. The workshop was organized by Cochlea Pune for Hearing and Speech in collaboration with the Divyang Bhavan Foundation and Pratham.

The central theme of the workshop, "Cross Disability Early Intervention for Facilitating Inclusive Education of Children with Disabilities," focused on equipping professionals with a comprehensive and inclusive approach to early intervention.

The workshop witnessed enthusiastic participation from 50 special educators and experts from across Maharashtra, refleeting a strong commitment toward advancing inclusive education practices.

The program commenced with a warm and dignified inaugural ceremony in the presence of esteemed dignitaries, including Mr. Paresh Gandhi (CEO, Divyang Bhavan), Ms. Raksha Deshpande (Education Director, Cochlea Pune), Ms. Sweta Maharatha (Pratham Education Foundation), Ms. Sunita Veling (Manager), Dr. Varsha Gathoo (Former HOD Education Department AYJNISHD), Ms. Gitanjali Palkar and Mr.Nandkumar Phule from Divyang Bhavan.

Over the course of three days, expert-led sessions were conducted by Dr. Varsha Gathoo, Ms. Raksha Deshpande, Ms. Deepali Kapoor (Program Head, Pratham Education Foundation), Dr. jayanthi narayan (Former Dy. Director NIEPID) and Ms. Gitanjiali Palkar. These sessions provided in-depth insights and practical guidance on key areas such as :

- The need, concept and rationale of the cross-disability approach
- Curricular framework for early intervention and school readiness
- Developmental domains and approaches to learning
- Foundations of early childhood development and disability inclusion
- Identification of red flags and understanding developmental milestones
- NIPUN Inclusive framework
- Role of family in early intervention and family outcome measures

- IDEA framework
- Importance of play-based learning

The workshop also emphasized interactive learning through group presentations and skill-building activities, ensuring active engagement and practical understanding among participants.

The program concluded with a valedictory ceremony graced by Mr. Omprakash Deshmukh, (MD Divyang Bhavan Foundation PCME) and Ms. Nivedita Gharge, (Assistant Commissioner Divyang Cell, Social Development Department PCMC), Mr. Paresh Gandhi (CEO, Divyang Bhavan), Dr. Varsha Gathoo (Former HOD Education Department AYJNISHD), Ms. Deepali Kapoor (Program Head, Pratham Education Foundation). Their presence added significance to the successful culmination of the workshop.

The entire program was effectively anchored and co-ordinated by the RCI Course Co-ordinator, Ms. Smruti Kulkarni whose efforts ensured the smooth execution of the workshop.

Overall, the workshop was meaningful and impactful initiative, strengthening the knowledge, skills and collaborative spirit of special educators in fostering inclusive education for children with disabilities.

◆◆◆

**सोनाली करमरकर**
ॲक्टिव्हिटी थेरपिस्ट



दिनांक १५ मार्च २०२६ रोजी स्वातंत्र्यवीर समाजिक संस्थेतर्फे **''महिला दिन विशेष नारी शक्ती सन्मान व संवाद २०२६''** हा कार्यक्रम भावे महाविद्यालय, सदाशिव पेठ, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता.

या सोहळ्यात सामाजिक, शैक्षणिक व कला क्षेत्रात अनेक वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या स्त्रियांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमात आपल्या संस्थेच्या संचालिका सौ.रक्षा देशपांडे मॅडम यांचा आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील आदर्श व प्रेरणादायी कार्याची दखल घेऊन त्यांना गौरविण्यात आले.

या सन्मानामुळे संस्थेचा अभिमान वाढला असून इतरांसाठीही प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे. या कार्यक्रमाला स्वरनाद केंद्रातील पाच शिक्षिका उपस्थित होत्या. कार्यक्रम उत्साहात व आनंददायी वातावरणात पार पडला.

◆◆◆

## अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्यासाठी जनजागृतीपर सत्र

**अनुपमा ढमाळ**
सोशल वर्कर, स्वरनाद कोथरुड केंद्र

**१) दिनांक : २६ फेब्रुवारी २०२६ – उपस्थिती : २८**
**स्थळ : वारजे नाका अंगणवाडी, कर्वेनगर, पुणे.**
**साधन व्यक्ती : १) तृप्ती कोहिनकर, २) नेहा नाटेकर**

**२) दिनांक : १४ मार्च २०२६ – उपस्थिती : ५२**
**स्थळ : चावडीची अंगणवाडी, रामनगर, पुणे.**
**साधन व्यक्ती : १) अनुपमा ढमाळ, २) आरती रेणुसे**

**३) दिनांक : २० मार्च २०२६ – उपस्थिती : ४५**
**स्थळ : तीन हत्ती चौक अंगणवाडी, धनकवडी, पुणे.**
**साधन व्यक्ती : अनुपमा ढमाळ**

**अहवाल :**

कॉक्लिआ पुणे हिअरिंग ॲण्ड स्पीच, स्वरनाद रिहॅबिलिटेशन सेंटर यांच्या वतीने वरील तीन ठिकाणी अंगणवाडी सेविकांसाठी ''कर्णबधिर मुलांचे लवकर निदान व त्वरित उपचार'' या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

सदर कार्यक्रमामध्ये ०–६ वयोगटातील मुलांची कर्णबधिरतेची प्रारंभिक लक्षणे, तसेच लवकर निदान होण्याचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच कर्णबधिर मुलांचे लवकर निदान होऊन त्यांना वेळेत योग्य उपचार व हस्तक्षेप मिळणे आवश्यक असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

अंगणवाडी सेविकांचे बालकांशी असलेल्या दैनंदिन संपर्कातून निरीक्षण करण्याची भूमिका महत्त्वाची असल्याचे स्पष्ट करण्यात आले. अशा प्रकारची मुले आढळून आल्यास त्यांना पुढील तपासणी व उपचारांसाठी संस्थेमध्ये संदर्भित करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान सहभागी सेविकांनी सक्रिया सहभाग नोंदवून आपल्या शंका विचारल्या व त्यांचे निरसन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी कॉक्लिआ पुणे हिअरिंग ॲण्ड स्पीच, स्वरनाद रिहॅबिलिटेशन सेंटर येथे उपलब्ध सेवा व सुविधांबाबत माहिती देण्यात आली. यामध्ये पूर्वप्राथमिक शिक्षण, संदर्भित सेवा, स्पीच थेरपी, ऑडिओलॉजिस्ट याबाबतचीही माहिती देण्यात आली.

**OUTCOME :**

सत्र परस्परसंवादी झाले. तीन हत्ती चौक येथील अंगणवाडीकडून दोन कर्णबधिरत्व असलेली मुले निदर्शनास आली. याचा पाठपुरावा सुरू आहे. महिलांचा उस्फुर्त सहभाग होता. विषय किंवा या मुलांसाठी शाळा असते हेही त्यांच्यासाठी नवीन होते कर्णबधिर मुले आढळून आल्यास नक्की संदर्भित करण्यात येईल किंवा माहिती चांगली मिळाली चित्रांच्या माध्यमातून अजून माहिती मिळावी असे अभिप्राय फॉर्म मधून समजले.

◆◆◆

## पालक सप्ताह – जागतिक महिला दिनानिमित्त

सोनाली करमरकर
ॲक्टिव्हिटी थेरपिस्ट, स्वरनाद कोथरुड केंद्र

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून स्वरनाद केंद्रात पालक सप्ताहाचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले होते. दरवर्षीप्रमाणे यंदा हा उपक्रम दि.२ मार्चपासून सुरू करण्यात आला. या पालक सप्ताहाचा मुख्य उद्देश पालकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, त्यांच्या सहभागातून मुलांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे आणि पालकांमधील सुप्त गुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा होता.

या सप्ताहात विविध कला गुणदर्शन कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कर्णबधिर बालकांचे संगोपन करताना पालकांनी त्यांच्या मुलांमधील लपलेल्या गुणांना ओळखून त्यांना येग्य दिशा देणे अत्यंत महत्त्वाचे असते. याच उद्देशाने पालकांना स्वतःच्या कलागुणांचे प्रदर्शन करण्याची सुवर्णसंधी या माध्यमातून देण्यात आली.

शाळेच्या सुरुवातीच्या दिवसांत आपल्या मुलांच्या काळजीने चिंताग्रस्त झालेले पालक आणि या पालक सप्ताहाच्या माध्यमातून मुलांच्या प्रगतीमुळे आत्मविश्वासाने स्वतःला नव्याने शोधणारे पालक, असे एक अतिशय बोलके आणि प्रेरणादायी चित्र यावेळी अनुभवायला मिळाले.

झपूर्झा येथे रांगोळी, पत्र लेखन, नृत्य, हस्तकला, पाककला अशा विविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.पालकांसाठी सहलही आयोजित केली होती.

कार्यक्रमातील प्रत्येक स्पर्धेसाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना परीक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धकांना योग्य मार्गदर्शनही मिळाले. पालकांच्या सहभागामुळे संपूर्ण वातावरण आनंददायी, उत्साही आणि प्रेरणादायी झाले होते.

या विशेष प्रसंगी नेहा नाटेकर, तृप्ती कोहिनकर आणि अनुपमा ढमाळ मॅडम यांनी उपस्थित सर्व पालकांना मार्गदर्शन केले. तसेच पालक सप्ताह उपक्रम घेण्यासाठी राधिका शाह, सोनिका बाबर यांचा हातभारही मोलाचा होता. एकूणच, पालक सप्ताह हा केवळ एक कार्यक्रम न राहता पालक आणि शिक्षक यांच्यातील नाते अधिक दृढ करणारा, मुलांच्या प्रगतीसाठी एकत्रित प्रयत्न करण्याची प्रेरणा देणारा आणि सर्वांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला. या उपक्रमामुळे पालकांमध्ये आत्मविश्वास वाढला आणि आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी ते अधिक सक्षमपणे पुढे येऊ लागले.

---

**दि.२३ मार्च २०२६ रोजी स्वरनाद केंद्रात** सर्व शिक्षिका व कर्मचारी वर्गासाठी **हेल्थ चेकअपचे आयोजन** करण्यात आले होते. या उपक्रमासाठी चिंचवड येथील मोरया हॉस्पिटलमधील पॅथॉलॉजिस्ट उपस्थित होत्या.

आरोग्य तपासणी अंतर्गत सर्वांचे वजन मोजण्यात आले तसेच ब्लड सॅम्पल घेऊन लिपिड प्रोफाईलसह आवश्यक रक्त तपासण्या करण्यात आल्या.

या उपक्रमाचा उद्देश कर्मचारी वर्गाच्या आरोग्याची तपासणी करून त्यांना आरोग्याबाबत जागरूक करणे हा होता. सर्वांनी या तपासणीमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. हा उपक्रम सर्वांसाठी उपयुक्त ठरला.

◆◆◆

# पालक सप्ताह २०२६


पाहुणे डॉ. स्वाती सदाकाळे मॅडम


पाहुणे माया ननावरे मॅडम


पाहुणे डॉ. एके मॅडम





## पाककला स्पर्धा










## रंगांच्या रेषांमध्ये विषयांची अभिव्यक्ती









रांगोळीस्पर्धेसाठी पाहूणे आणि प्रशिक्षक म्हणून लाभले श्री. महेंद्र सर

# पालक सप्ताह २०२६

## पालकांची पत्र लेखनाची स्पर्धा









पालकांसाठी मनोरंजक खेळ

## पालकांच्या सहभागातून रंगलेला सांस्कृतिक सोहळा











# पालक सप्ताह २०२६

















परिक्षक म्हणून लाभले –
**शिल्पा दातार, अमृता पांडे आणि क्षितीजा अजगेकर**



नोडल ऑफिसर आणि
बालविकास प्रकल्प अधिकारी
**मा. मनीषा बिरारिस मॅडम**
अंगणवाडी सेविकांशी संवाद साधताना



अंगणवाडी सेविकांचा संवादात्मक खेळ घेताना
समुपदेशक **अश्विनी नेरळीकर मॅडम**



अंगणवाडी सेविका आणि सुपरवायसर
यांच्या मनाशी संवाद साधताना **अश्विनी नेरळीकर मॅडम**



प्रमुख पाहुण्या **तृप्ती ढेरे मॅडम**
ह्यांचे स्वागत करताना **सौ.रक्षा मॅडम**







## झपूर्झा
## येथे पालकांची सहल

## जागतिक श्रवणदिन जनजागृती रॅली

**नेहा नाटेकर**
समुपदेशक, स्वरनाद कोथरुड केंद्र, पुणे

**दिनांक : ५ मार्च २०२६, वार : गुरुवार**
**स्थळ : जनता वसाहत, पर्वती पायथा, पुणे.**
**आयोजक संस्था : स्वरनाद पुनर्वसन केंद्र, कोथरुड, पुणे.**

**प्रस्तावना :**

जागतिक श्रवण दिनानिमित्त स्वरनाद पुनर्वसन केंद्राने जनजागृती रॅलीचे आयोजन केले. या उपक्रमाचा उद्देश समाजात श्रवण आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, श्रवणदोषाचे लवकर निदान व तत्पर उपचार यांचे महत्त्व पटवून देणे आणि याबद्दल माहिती प्रसारित करणे हा होता.

**कार्यक्रमाचा तपशील :**

रॅलीची सुरुवात सकाळी केंद्राच्या आवारातून झाली. केंद्रातून पालक, मुले, शिक्षिका आणि सह कर्मचारी या सर्वांना घेऊन साधारण सकाळी १०.०० च्या सुमारास जनता वसाहतीत पोहोचलो. विद्यार्थी, पालक, शिखक व कर्मचारी यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. सहभागी मंडळींनी श्रवण आरोग्याशी संबंधित घोष वाक्ये दिली.

माहिती पत्रके, बॅनर्स व घोषणांच्या माध्यमातून नागरिकांना श्रवण आरोग्याविषयी माहिती देण्यात आली. रॅलीदरम्यान स्थानिक नागरिकांशी संवाद, तिथल्या घरांमध्ये जाऊन तसेच दवाखाने व शाळांमध्ये जाऊन उपस्थित असलेल्या लोकांशी संवाद साधून श्रवण तपासणीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

**सहभाग व प्रतिसाद :**

एकूण विद्यार्थी – ३५ ;
पालक – ३५ ;
शिक्षक – ३० ;
सहकर्मचारी – १५ ; सहभागी झाले.

– स्थानिक नागरिकांनी रॅलीला सकारात्मक प्रतिसाद दिला.

**परिणाम :**

- नागरिकांमध्ये श्रवण आरोग्याविषयी जागरूकता वाढली.
- पुनर्वसन केंद्राच्या सेवांविषयी माहिती व्यापक प्रमाणात पाहोचली.
- श्रवणदोष असलेल्या मुलांमध्ये आत्मविश्वास व सामाजिक सहभाग वृद्धिंगत झाला.

**निष्कर्ष :**

या रॅलीमुळे जनता वसाहत परिसरातील नागरिकांमध्ये श्रवणबाधित मुलांचे तत्पर निदान व उपचार याबाबत जागरूकता निर्माण झाली. तसेच कॉक्लिआ संस्थेच्या कार्याबाबतही नागरिकांना माहिती मिळाली.

श्रवणदोष असलेल्या व्यक्तींविषयी संवेदनशीलता व सकारात्मक दृष्टिकोन वाढविण्यासाठी उपयुक्त ठरली. या रॅलीमुळे जनता वसाहत परिसरातील नागरिकांमध्ये श्रवणबाधित मुलांचे तत्पर निदान व उपचार याबाबत जागरूकता निर्माण झाली. तसेच कॉक्लिआ संस्थेच्या कार्याबाबतही नागरिकांना माहिती मिळाली.

◆◆◆

**Your generosity can make a deaf child Speak**

Cochlea is registered under :
BPT 1950 Act.
Society Reg. Act.
PAN No. AAATC5056E

---

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | 'Cochlea Pune for Hearing and Speech' |
| Account No. | : | 60040230428 |
| Bank | : | Bank of Maharashtra |
| Branch | : | Shivajinagar, Pune. |
| IFSC Code | : | MAHB0000043 |

**All Donations are exempt under section 80G of the Income Tax Act.**

## गोव्याचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे, पर्वरी केंद्र

गोकुळ नवंगुने
विशेष शिक्षक, स्वरनाद, गोवा केंद्र

अनघा वाचासुंदर प्रतिष्ठान आणि कॉक्लिआ पुणे यांच्या सहयोगाने पर्वरीमध्ये स्वरनाद कर्णबधिर मुलांसाठी वाचा–भाषा प्रशिक्षण चालवले जाते.

स्वरनाद पर्वरी केंद्राचे स्नेहसंमेलन रविवारी दि.१५ मार्च २०२६ रोजी संजय स्कूल, पर्वरी येथे पार पडले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या सौ. सुलक्षा गावस मॅडम तसेच श्री.प्रवीण फलदेसाईसर (वकील) उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात गणपतीच्या डान्सने झाली, फुलपाखरूचा डान्स झाला, देशगीतावर डान्स झाला, भारतीय परंपरेनुसार डान्स झाला. कर्णबधीर मुलांना कसे ओळखावे त्यांना स्पीच थेरपीचे महत्त्व सांगणारे नाटक पालकांनी केले. स्वरनादच्या मुलांनी कविता, गोष्टी सांगितल्या.

या कार्यक्रमात गोव्यातील विविध स्पेशल शाळांतील विशेष शिक्षकांचे सत्कार करण्यात आले. आनंद निकेतनच्या मुख्याध्यापिका सौ. गीता राणे यांचा सन्मान णाला. लोकविश्वास प्रतिष्ठानचे शिक्षक सचिन ताटे यांचा सन्मान झाला. ऑडिओलॉजिस्ट बाळकृष्ण सावंत आणि स्वाती भट मॅडम यांचासुद्धा सन्मान झाला, डिस्ट्रिक्ट हॉस्पिटलचे विशेष शिक्षक लक्ष्मण नाईक यांचा सत्कार झाला.

या वर्षीच्या आदर्श पालक म्हणून अमया कळुंटकर यांना मिळाले तर आदर्श विद्यार्थी म्हूणन नवया विनोदकर हिला बक्षिस देण्यात आले.

पालकांच्या पाककला स्पर्धा घेतल्या, त्याची थीम होती चणाडाळ पासून पदार्थ बनवणे. त्यांची बक्षिसे स्नेहसंमेलनमध्ये दिली.

सुलक्षा गावस आपल्या भाषणामध्ये म्हणाल्या, ''ही मुले नॉर्मल बोलतात हे खुप मोठी गोष्ट आहे. त्यांच्या डोळ्यात उद्याचा भारत मी पाहत होते. खुप उत्साहाने ही मुले डान्स करत होती. स्टेजवर बोलत होती. पालकांनी खचून न जाता उत्साहाने या मुलांना पुढे आणावे'' हे असे मार्गदर्शन केले. कॉक्लिआ संस्थेचे मुख्य कार्यकारी विश्वस्त डॉ. अविनाश वाचासुंदर सरांनी कर्णबधिर मुलांसाठी प्रशिक्षण खुप गरजेचे आहे, यावर सांगितले. श्री. आनंद वाचासुंदर सरांनी प्रतिष्ठानचाआगामी प्रकल्प याविषयी सांगितले.

सौ. श्रेया वाचासुंदर मॅडम यांनी दिपस्तवन म्हटले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वरनादचे माजी विद्यार्थीनी कु.देवांशी घिसे आणि कु.वीरा सओइकर यांनी केले आणि मुख्य सूत्रसंचाल ॲडव्होकेट सौ. वैशाली वाचासुंदर मॅडम यांनी केले. वैष्णवी निवंगुणे यांनी अहवाल वाचन केले तर गोकुळ निवंगुणे यांनी आभार मानले.

## गोव्याचे स्नेहसंमेलन २०२६, फोंडा केंद्र

दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ या दिवशी स्वरनादचे फोंडा येथील सेंटरचे स्नेहसंमेलन झाले. या स्नेहसंमेलनाला प्रमुख पाहुणे डॉ. संतोष उसगावकर (अध्यक्ष, आय.एम.ए.) हे लाभले होते. कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलाने झाली. मुलांनी गणपती बाप्पाचे आगमन

यावर डान्स केला. छोट्या गटातील मुलांनी फुलपाखरू छान किती दिसते.. या गाण्यावर डान्स केला. नंतर चिऊताई चिऊताई माझ्या अंगणात ये.. हे गाणे सादर झाले. रूनाली मिराशी या माजी विद्यार्थीनीने इंग्लिशमधून आपले मनोगत सांगितले. भारतीय डान्स या गीतावर डान्स झाला. कोण केहता है, भगवान आते नही। या गाण्यावर डान्स झाला. पालकांनी कर्णबधीर मुलांच्या जीवनावर नाटक केले. छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी नन्ना..मुन्ना राही..हूँ... या गाण्यावर डान्स केला. निया, साई, आर्या तेहेरीम, विनया यांनी आपले मनोगत सांगितले. साईचे बाबा यांनी मनोगत व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वरनादची माजी विद्यार्थीनी देवांशी घिसे, स्वरांग बेतोडकर, तनिशा नाईक यांनी केले.

पालकांच्या पाककला स्पर्धा भरवल्या होत्या, त्यांचे बक्षिस वितरण समारंभ झाला. या वर्षीचा आदर्श पालक म्हणून भरतची आई देऊदेवी यांचा सन्मान झाला. आदर्श विद्यार्थी म्हणून साई नाईक या विद्यार्थ्याचा सन्मान झाला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

◆◆◆

## होळी पौर्णिमा आणि धुलिवंदन

**मनिषा मोहिते**
विशेष शिक्षिका, पुसाळकर स्वरनाद उरवडे केंद्र

दिनांक २ मार्च २०२६ रोजी पुसाळकर स्वरनाद उरवडे येथे होळीचा कृतिपाठ घेण्यात आला. यात २४ मुले, २४ पालक आणि ५ शिक्षिका सहभागी होत्या. वनिता मॅडम यांनी होळीचा लेसन घेतला. होळीसाठी लागणाऱ्या सर्व वस्तू दाखवल्या. शब्द चिठ्ठी दाखवून समजावले. प्रत्येक वाक्याचा अर्थ समजावला व कृती करून दाखवली. सणासाठी काय लागते हे सांगून मुलांच्या भाषा विकासात भर पडली.

दुसऱ्या दिवशी धुलिवंदन साजरी करतात, ती कशी करतात हे समजावले व मुलांकडून तक्ता वाचन घेतले.

होळीची पूजा करून होळी पेटवली आणि नैव्येद्य दाखवला. मुलांना प्रत्यक्ष कृतीतून दाखवल्यामुळे छान समजले. त्यानंतर मुलांना कोरडा रंग दिला व मुले रंग खेळली. अशा प्रकारे मुलांनी होळी व धुलिवंदनाच्या लेसनचा आनंद घेतला.

**गुढीपाडवा –**

दिनांक २० मार्च २०२६ रोजी पुसाळकर स्वरनाद पुर्नवसन केंद्र येथे गुढीपाडवा हा लेसन घेण्यात आला. या कृतीपाठासाठी लाभलेले पाहुणे आर्किटेक्ट अविनाश देखणे सर होते. या गुढीपाडव्याच्या निमित्ताने ते स्वरनाद केंद्राला भेट देण्यासाठी आले होते. गुढीपाडव्याचा लेसन घेऊन मुलांना सणाची माहिती सांगितली व मराठी महिन्यातला हा पहिला सण असतो हे समजावून सांगितले व गुढी कशी उभारतात, त्यासाठी काय साहित्य लागते, हे कृती करून दाखवले व गुढी उभारून त्याची पूजा कशी करतात हे दाखवले. समजावले तसेच मुलांकडून तक्ता वाचन करुन घेतले. या कार्यक्रमासाठी डॉ. अविनाश वाचासुंदर सरही आले होते. सरांनी पाहूण्यांना शाळेची माहिती सांगितली व मातांना मार्गदर्शन केले अशा रितीने गुढीपाडव्याचा लेसन साजरा करण्यात आला. ◆◆◆

## होय... आमची वीरा बोलू लागली

**श्री.जगदीश नलवडे**
पालक, पुसाळकर स्वरनाद केंद्र, उरवडे

नातीच्या जन्माची बातमी प्रत्येक आजोबांसाठी आनंदाची असते. माझ्यासाठीही तशीच होती. पण वीरा जन्मतः कर्णबधिर असल्याचे समजल्यावर मन खूप व्यथित झाले. घरात आधीच मुलगा आणि सून दोघेही कर्णबधिर असल्याने मनात एक छोटीशी आशा होती की, नात तरी ऐकू येणारी असेल, ती आशाही तुटली. त्या क्षणी खूप दुःख झाले, पण आज मागे वळून पाहताना जाणवते की हाच प्रसंग आम्हाला अधिक खंबीर बनवून गेला.

वीराच्या उपचारांचा प्रवास सोपा नव्हता. योग्य मार्गदर्शन, योग्य डॉक्टर आणि योग्य निर्णय यांची साखळी जुळत गेली म्हणून आजचा हा दिवस पाहायला मिळतो आहे. डी. वाय. पाटील हॉस्पिटल, कोल्हापूर येथील ई.एन.टी. विभागाच्या प्रमुख डॉ.राजश्री माने मॅडम यांनी अतिशय काळजीपूर्वक तपासणी करून पुढील उपचारांची दिशा दाखवली. त्यानंतर पुणे येथील डॉ. अक्षय वाचासुंदर यांच्याकडे शस्त्रक्रियेचा निर्णय झाला. त्यांनी केवळ कॉक्लिया इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वी केली नाही, तर संपूर्ण प्रक्रियेत आत्मविश्वास, धीर आणि माणुसकीची साथ दिली. ऑपरेशनच्या खर्चासाठी संस्थांकडून आर्थिक मदत मिळवून देणे ही त्यांची मोठी संवेदनशीलता होती. डॉक्टर हा फक्त उपचार करणारा नसतो, तर कुटुंबाला उभारी देणारा असतो हे त्यांच्या कामातून स्पष्ट दिसले.

शस्त्रक्रियेनंतरचा पुढचा आणि सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे प्रशिक्षण. याच ठिकाणी पुसाळकर स्वरनाद शाळेने आमच्या आयुष्यात खरा बदल घडवला. उरवडे, पुणे येथील ही शाळा कर्णबधिर मुलांसाठी काम करणारी एक विलक्षण संस्था आहे. येथे मुलं आणि आई एकत्र राहून शिक्षण घेतात ही संकल्पना अत्यंत परिणामकारक आहे. त्यामुळे शिकणे ही केवळ शाळेपुरती मर्यादित प्रक्रिया राहत नाही, तर ती घर आणि दैनंदिन जीवनाचा भाग बनते.

शाळेतील वातावरण प्रेमळ, संयमी आणि प्रोत्साहन देणारे आहे. मुख्याध्यापिका कविता मॅडम यांचे मार्गदर्शन आणि सर्व शिक्षकांचे समर्पित काम पाहून मनापासून आदर वाटतो. प्रत्येक मुलाच्या छोट्या प्रगतीलाही येथे मोठे स्थान दिले जाते. मुलांच्या क्षमतेनुसार त्यांच्यावर सातत्याने काम केले जाते. त्यामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढतो आणि पालकांनाही नवी उमेद मिळते.

आज वीरा आवाज ओळखते, बोलण्याचा प्रयत्न करते, वाचायला शिकते

आहे. वीसपर्यंत अंक ओळखते, शब्द आणि अंक जुळवते. तिच्या तोंडून उमटणारा प्रत्येक शब्द आमच्यासाठी आनंदाचा क्षण असतो. काही महिन्यांपूर्वी जे अशक्य वाटत होते, ते आज हळू हळू प्रत्यक्षात उतरते आहे. हा बदल फक्त शस्त्रक्रियेचा परिणाम नाही, तर योग्य प्रशिक्षण, योग्य संस्था आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांचा एकत्रित परिणाम आहे.

या संपूर्ण प्रवासात साथ देणाऱ्या डॉ. राजश्री माने मॅडम, डॉ. अक्षय वाचासुंदर, मदत करणाऱ्या संस्था आणि विशेषतः पुसाळकर स्वरनाद शाळेचे मी मनःपूर्वक आभार मानतो. त्यांनी आमच्या नातीला केवळ ऐकण्याची आणि बोलण्याची संधी दिली नाही, तर व्यक्त होण्याचा आत्मविश्वास दिला. एका कुटुंबाच्या आयुष्यात आशेचा दिवा पेटवण्याचे काम त्यांनी केले.

मनापासून कृतज्ञता,

अशी सेवा अधिकाधिक मुलांपर्यंत पोहोचत राहो, हीच सदिच्छा...

◆◆◆

## होळी – कोथरुड केंद्र

**तेजश्री जाधव**, स्पीच थेरपिस्ट
स्वरनाद कोथरुड केंद्र

मराठी वर्षातील होळी हा शेवटचा सण असतो. मराठी महिन्यानुसार फाल्गुन या महिन्यात होळी हा सण साजरा केला जातो.

दिनांक २ मार्च २०२६ या दिवशी स्वरनाद केंद्रातदेखील होळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रत्येक सण साजरा करताना विद्यार्थ्यांना सणांची माहिती व्हावी त्याचबरोबर पालकांना मुलांना कशी माहिती समजावून द्यावी याचे मार्गदर्शन करण्यासाठी वेळोवेळी लेसन घेण्यात येतात.

यावर्षी होळी सणाचा लेसन स्वरनादमधील कोमल गायकवाड आणि दिपाली साळुंखे या शिक्षिकांनी घेतला. होळी सणाची माहिती देताना प्रत्यक्ष सर्व वस्तू जसे गोवऱ्या, पालापाचोळा, पूजेचे साहित्य, नैवेद्य, पुरणपोळी यासर्व वस्तू, त्यांच्या शब्दचिठ्ठ्या, चित्रे, तक्ता हे शैक्षणिक साहित्य वापरुन अतिशय सोप्या पद्धतीने लेसन घेतला.

शाळेच्या खालच्या आवारात प्रत्यक्ष होळी पेटवून दाखवली. प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती जयमती दळवी मॅडम, वैद्य मॅडम यांच्या हस्ते होळीची पूजा करुन होळी पेटवण्यात आली. नंतर मुलांनी आणि शिक्षिकांनी एकमेकांना रंग लावून होळी सणाचा आनंद द्विगुणीत केला.

◆◆◆

## SWARANAAD REHABILITATION CENTER
## Monthly Achievement - MARCH 2026

| Sr. No. | FACILITIES | SESSION / STUDENT COUNT |
|---|---|---|
| 1. | Speech Therapy Sessions | 267 |
| 2. | No. of Student getting Speech Therapy | 65 |
| 3. | Aided Audiogram Testing | 16 |
| 4. | No. of Speech Assessment | 4 |
| 5. | No. of Counseling Sessions | 5 |
| 6. | Individual Occupation Therapy Sessions | 82 |
| 7. | No. of Students getting Individual OT | 46 |
| 8. | Group Occupational Therapy Sessions | 2 |
| 9. | Psychological Assessment | 10 |
| 10. | No. of Activity Therapy Session | 20 |

## SWARANAAD OUTREACH CENTER
## Monthly Achievement - MARCH 2026

| Sr. No. | CENTERS | THERAPY SESSION |
|---|---|---|
| 1. | Khed | 0 |
| 2. | Narayangoan | 39 |
| 3. | YCM Pimpari | 92 |
| 4. | Morya Chinchwad | 86 |
| 5. | Phonda | 41 |
| 6. | Porvorim | 48 |
| 7. | Manchar | 66 |
| 8. | Daund | 19 |
| 9. | Urawade (Residential) | 12 |
| 10. | Kudal | 48 |

## संस्थेची केंद्र

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांचे बहुआयामी अपंग पुनर्वसन केंद्र**
बिंदू माधव ठाकरे दवाखाना,
गोसावी वस्ती समोर, हॅप्पी कॉलनी रोड,
कोथरूड, पुणे - ४११ ०३८.
**संपर्क : रक्षा देशपांडे ९९२३२८९८४४**
**मृदुला देवळाणकर ८५५०९१२९७७**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, चिंचवड**
मोरया मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी-चिंचवड लिंक रोड, पी.एम.टी.शेवटच्या बसस्टॉप समोर, चिंचवडगाव, पुणे ३३.
**फोन : ९८२२६७१८४० / ९५२१६०४६००**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, खेड**
डॉ. खडके गेस्ट हाऊस,
राजगुरुनगर बाजारपेठ, ता. खेड, पुणे.
**फोन : ९८५०७३८२७६**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, नारायणगाव**
सावळेराम मार्केट, नारायणगाव,
डॉ.वाचासुंदर कान-नाक-घसा क्लिनिक, पुणे.
फोन : ९७६६२६२३२७; ७७९८४३४९८९

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांची पूर्व प्राथमिक शाळा, पर्वरी-गोवा**
अनघा, प्लॉट नंबर १५, पी.डी.ए. कॉलनी,
पर्वरी बार्देश, गोवा - ४०३ ५२१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**श्री शारदा ग्रंथ प्रसारक संस्था, सांचालित स्वरनाद कर्णबधिर मुलांसाठी पूर्व-प्राथमिक विद्यालय**
एफ-४, पहिला मजला, पै हाऊस सदन,
फौंडा, गोवा - ४०२ ४०१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, पिंपरी**
वाय.सी.एम. हॉस्पिटल,
(पिंपरी-चिंचवड पालिकेच्या संयुक्त विद्यमाने) पिंपरी.
**फोन : ८०८७२२९९५४**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, दौंड**
शालीमार चौक, आनंद अपार्टमेंट,
'सी' विंग, फ्लॅट नं.२,
फॉरेस्ट ऑफिस समोर, ता. दौंड, पुणे.
**फोन : ७०४०६६८०७१/९२८४८५०७५०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, मंचर**
डॉ. तोडकर हॉस्पिटल, पिंपळगाव फाटा,
मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.
**फोन : ९४२३०९३७८०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, कुडाळ**
लायन्स सेवा संकुल कुडाळ, अभिनवनगर,
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
**फोन : ९४०५९९८९८९**

**'पुसाळकर स्वरनाद' माता बालक निवासी पुनर्वसन केंद्र**
माँटवर्ट विस्टा समोर, सर्वे नं. ४२५,
उरवडे, पिरंगुट, ता. मुळशी,
पुणे - ४१२ ११५.
**फोन : ९८२२०९४९४०**

## स्वातंत्र्यवीर सामाजिक संस्थेतर्फे सौ. रक्षा देशपांडे यांना

**महिला दिन विशेष नारी शक्ती सन्मान व संवाद २०२६ पुरस्कार देण्यात आला.**





कोथरुड केंद्र

## गुढीपाडवा



दौंड केंद्र



कोथरुड केंद्र

# होळी आणि रंगपंचमी सण उत्साहात साजरा



मोरया केंद्र



कोथरुड केंद्र



RNI No. : MAHBIL/2013/59067
SDM/PUNE/SR/21/2015

Published and Posted on 10th APRIL, 2026
Posted at Model Colony PSO, Pune 411 016
on 10 of each month.



## Cross Disability Early Intervention for Facilitating Inclusive Education of Children with Disabilities







**Address :**
**To,**